# मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय

**कडेगाव**

ता. कडेगाव, जिल्हा- सांगली 415 304

आणि

**रयत शिक्षण संस्थेचे**

## सद्‌गुरु गाडगे महाराज महाविद्यालय

कराड, जिल्हा- सातारा

या संस्थांमधील

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

२६ एप्रिल २०२२

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐ ZK 719816

I/c. Principal
B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya,
Kadegaon,Dist. Sangli

15 MAR 2022

B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya KADEGAON

**मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव, जि. सांगली-415 304**

**आणि**

**सद्‌गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कराड**

मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय कडेगाव व सदगुरू गाडगे महाविद्यालय कराड यांच्यामध्ये प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना एकमेकांच्या शैक्षणिक आणि संशोधन उपक्रमांचा लाभ मिळावा यासाठी हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya
KADEGAON

वरील नमूद केलेल्या मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव, जिल्हा-सांगली आणि सदगुरू गाडगे महाविद्यालय, कराड या संस्था दिनांक २५ डिसेंबर २०२२ रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टे खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत .

**उद्दिष्टे**

१. मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयावर संशोधन प्रकल्प राबविणे .

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन यांच्या आयोजनासाठी संयुक्त बैठकांचे आयोजन करणे .

३. विद्यापीठ अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे .

४. निबंध, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे .

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे .

६. व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे .

७. विविध साहित्य विषयावर, प्राध्यापकांच्या शैक्षणिक समस्या वर चर्चा करणे .

८. सृजनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे .

९. मोडी लीपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता, इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे .

१०. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी या संदर्भात सूचना व पत्रव्यवहार करणे .

**एकमेकांना साहाय्य करण्याचे प्रस्तावित माध्यम**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे .

२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे .

३. उपलब्ध साधन सामग्री नुसार या संस्थांकडून एक निश्चित योजना तयार करणे .

४. साहित्य व आणि विचार यांची देवाण-घेवाण करणे .

५. दरवर्षी तीन बैठकांचे आयोजन करून विचारविनिमय करणे .

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे .

**अटी आणि शर्ती**

१. सर्व कार्यक्रमांमध्ये आणि उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील मराठी विभागाने सहभागी होणे.

२. एखादा कार्यक्रम, उपक्रम महाविद्यालयाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद आप-आपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

३. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांची नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. दोन महिन्यांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

४ . कोणत्याही महाविद्यालयात प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही .

५ . सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखीन पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय आणि अंमलबजावणी**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य, विभाग प्रमुख आणि समन्वयक काम करतील .

२. सदर सामंजस्य करार १०० रुपयेच्या स्टॅम्प पेपरवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीच्या अधीन राहून तीन प्रतीमध्ये अमलात येत आहे .

३. सदर व परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयक अधिकाऱ्यात होत आहे, तसेच वर नमूद केलेल्या दिनांक वर्षानुसार अंमलात येत आहे .

प्रा. डॉ. सविता माळी
समन्वयक
भा. वि. मा. ब. श्री. कदम
कन्या महाविद्यालय, कडेगाव

प्रा. उज्ज्वला देसाई
विभाग प्रमुख
भा. वि. मा. ब. श्री. कदम
कन्या महाविद्यालय, कडेगाव

डॉ. व्ही. वाय. कदम
प्रभारी प्राचार्य
भा. वि. मा. ब. श्री. कदम
कन्या महाविद्यालय, कडेगाव

विभाग प्रमुख
सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय
कराड

प्राचार्य
सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय
कराड